# सहसंचालक, तंत्र शिक्षण संचालनालय,

प्रादेशिक कार्यालय, शासकीय तंत्र निकेतन परीसर, सदर, नागपूर.

दुरध्वनी क्र. ०७१२–६४६५१४५/१४६ E-mail:ronagpur.dte@gmail.com फॅक्स क्र. ०७१२–२५६१६६३

Web Site : rdtenagpur.org.in


अति महत्वाचे

क्रमांक :– तंशिस/प्राकाना/शैवि–३/प्रवेश/२०१३/ 1864

दि. 26 JUN 2013 /२०१३

प्रति,

संचालक/प्राचार्य,

________________________

(सर्व पदवी/पदव्युत्तर पदवी तसेच पदविका संस्था)

विषय :– व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश घेणा–या उमेदवारांच्या कागदपत्रांची पडताळणी करणेबाबत.

संदर्भ :– मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.,मुंबई यांचे पत्र क्र. २अ/एडीएम/२०१३/४६३, दि. २५ जून २०१३.

उपरोक्त संदर्भांकित विषयाचे अनुषंगाने आपणांस कळविण्यांत येते की, शैक्षणिक वर्ष २०१३–१४ मधील संचालनालयाच्या वतीने राबविण्यांत येणा–या सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया सुरू झालेली आहे. संचालनालयाच्या वतीने राबविण्यांत येणा–या अभ्यासक्रमाच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेव्दारे तसेच संस्था स्तरावरील प्रवेश निश्चित करतांना उमेदवारांच्या सर्व कागदपत्रांची आपले संस्थेतील प्राचार्यांनी/संस्था प्रमुखांनी आवश्यक ती पडताळणी करणे अत्यावश्यक आहे.

उमेदवारांनी बनावट किंवा खोटया कागदपत्रांच्या आधारे कोणत्याही प्रक्रियेतून संस्थेत प्रवेश घेऊ नये यासाठी प्रवेशित होणा–या उमेदवारांच्या सर्व कागदपत्रांची पडताळणी करण्याची योग्य ती खबरदारी घेण्यांत यावी. तसेच त्याबाबतचा अनुपालन अहवाल या कार्यालयास त्वरीत सादर करावा.

सहसंचालक,
तंत्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय,
नागपूर.

प्रत : मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.,मुंबई (का.क्र. २ अ) यांना माहितीस सादर.